Aayushi International Interdisciplinary Research Journal (AIIRJ)
VOL- VII ISSUE- III MARCH 2020 PEER REVIEW e-JOURNAL IMPACT FACTOR 6.293 ISSN 2349-638x

# वैदिक साहित्यातून प्रतित होणारे सरस्वती नदीचे ऐतिहासिक महत्व

प्रा.डॉ.किशन सुनेवार
(इतिहास विभाग प्रमुख)
देगलूर महाविद्यालय देगलूर
ता.देगलूर जि.नांदेड431717

प्राचीन भारतीय नद्यांमध्ये सरस्वती नदीचे स्थान वैशिष्ट्यपूर्ण आणि महत्वाचे होते. प्राचीन भारतीय सामाजिक, राजकिय, धार्मिक,सांस्कृतिक आणि आर्थिक जीवनात सरस्वती नदीचे फार मोठे योगदान होते. ऋग्वेद ग्रंथाच्या अनेक ऋचात सरस्वती नदीचे उल्लेख आलेले आहेत. ऋग्वेद ग्रंथातील मंडल दहाच्या चौसष्टव्या सुक्तातील नवव्या मंत्रात उल्लेख आहे की,'Öसरस्वती, शरयु आणि सिन्धु ह्या महान नद्या आहेत'.[1] त्यातच दहाव्या मंडलातील पंचाहत्तरव्या सुक्तातील पाचव्या ऋचेत गंगा, यमुना, सरस्वती,शतुद्री, पुरुष्णी इत्यादी एकवीस नद्यांना आवाहन केलेले आहे[2] वैदिक ग्रंथाच्या अनेक ऋचातून सरस्वती नदीचे महत्व स्पष्ट करण्यात आले आहे. जेंव्हा नमुची विरुध्द इंद्राचे युध्द झाले होते तेंव्हा आश्वीनी कुमारांनी इंद्राला सहायता केली होती त्यावेळी सरस्वतीने आश्विनी कुमारांचे कष्ट दुर केले होते असा उल्लेख आहे.[3] सरस्वतीला पुषण, इंद्र आणि मरुत देवतांसोबतही आवाहन केलेले आहे. ऋग्वेद ग्रंथात एका ठिकाणी सरस्वती नदीसाठी 'नदितमा', (नद्यांची माता) 'सिन्धुमाता' असे शब्दप्रयोग आल्यामुळे कांही इतिहासकारांनी म्हटले की, 'ऋग्वेदात वर्णनीत असलेली सरस्वती हे सिन्धूचेच एक नाव आहे.पण काही इतिहासकार म्हणतात की, 'सिंन्धू नदी आणि सरस्वती नदी ह्या वेगवेगळ्या आहेत. कारण सरस्वती नदीचे अनेक ऋचात स्वतंत्र उल्लेख आलेले आहेत' ऋग्वेदात वर्णन आहे की, 'यमुना व सतलूज नदीप्रमाणे सरस्वती नदी पुर्वेकडून पश्चिमेकडे वाहते'.

म्हणजे येथे सरस्वती नदीचा स्वतंत्रपणे उल्लेख आहे ती एक विशाल नदी होती. पण नंतरच्या काळात जे नैसर्गिक भौगोलिक बदल होत गेले त्यामुळे ही नदी लुप्त झाली.

## 1) ऋग्वेद :-

ऋग्वेद ग्रंथात सरस्वती नदीला 'सप्तथी' असे म्हटले आहे म्हणजे आर्यप्रदेशात वाहनारी सातवी प्रमुख नदी ही सरस्वती होय. सरस्वतीला 'सप्तस्वसा' असेही म्हटले आहे म्हणजे सात बहीणीतील एक असा त्याचा अर्थ होतो आर्यांच्या वास्तव्य असलेल्या सप्तसिंधु प्रदेशातुन ही नदी वाहत होतीहे स्पष्ट होते[4] सरस्वती नदी हिमालयात उगम पाऊन आपल्या विशाल जलधारेसह सर्वदुर मैदानी, डोंगराळ भागातून वाहत जाऊन शेवटी ती समुद्रात मिळाली. तो समुद्र एकेकाळी राजस्थानच्या विशाल भुभागावर होता. त्या सागरास ऋग्वेद काळात 'सारस्वत सागर' असे संबोधले जात होते.[5] ऋग्वेदकाळात सरस्वती नदीचा जलप्रवाह अती वेगवान असावा. कारण ह्या नदीने अनेक पर्वत, डोंगरांना भेदूनआपला वळणदार मार्ग बनविला होता असा उल्लेख ऋग्वेद ग्रंथात आला आहे. एका ऋचात म्हटले आहे की, 'सरस्वती नदी आपले विशाल जल घेवून वेगपूर्वक गर्जनेसह गमन करते आहे म्हणजे इतर नद्यांच्या तुलनेत हिचा जलप्रवाह अधिक तिव्र होता. ती रथाच्या गतीसमान प्रवाहित होत होती. तीला ऋग्वेदाच्या मंत्रात इतरनद्यापेक्षा श्रेष्ठ असल्याचे म्हटले आहे.[6]

सरस्वती नदिच्या किना-यावर वैदिक काळातील अनेक नगरे व राज्ये स्थापित झाली होती. तत्कालीन एक मोठा राजा ययाती नहुष याचे राज्य सरस्वती नदीच्या किना-यावरच होते. असा उल्लेख सापडतो [7] पूढे त्याचेच उत्तराधिकारी पुरु आणी त्याच्या पुढच्या पिढीचे राज्यही याच परिसरात होते. तसेच त्रितु जनपद सुध्दा सरस्वती नदीच्या दक्षिणी किना-यावर होते.त्रितु जनपदाचा राजा वध्रयश्व ला दिवोदास नावाचा एक धैर्यवान, कर्तुत्ववान पुत्र सरस्वतीपासुनच प्राप्त झाला असाही उल्लेख सापडतो म्हणजे [8] त्रितु जनपदाचा राजा



Dr. Anil Chidrawar
I/C Principal
A.V. Education Society's
Degloor College, Degloor Dist.Nanded

ADAT VYAPARI EDUCATION SOCIETY'S DEGLOOR COLLEGE, DEGLOOR Dist. Nanded

वध्रयश्वने पुत्रप्राप्तीसाठी सरस्वतीकडे नवस बोलले असावे म्हणून त्या राजाने पुत्रप्राप्तीचे श्रेय सरस्वतीलाच दिले असावे असे स्पष्ट होते. वैदिक साहित्यातील अनेक ऋचांची रचना सरस्वती नदीच्या पवित्र किना-यावरच झाली होती. म्हणून सरस्वतीला श्रेष्ठ गिते व श्रेष्ठ विचारांची प्रेरणा प्रदान करणारी असे म्हटले आहे.[9]

सरस्वती नदी राजकिय, सांस्कृतिक, आर्थिक आणी सामरीक दृष्टीने सुध्दा अतिशय महत्वाची नदी मानली जाते. तीला पाच जनपदांना समृध्दी प्रदान करणारी म्हटले आहे तीने जनपदांना तटबंदीप्रमाणे सुरक्षा प्रदान केली होती. शत्रूंचा संहार करणारी नदी असेही तीला म्हटले. तीला दुधदुपते प्रदान करणारी जीवनदायी असेही म्हटले आहे. म्हणूनच आर्यांनी तीला माता, देवीच्या रुपात स्विकारले आहे. उत्तम श्रेष्ठ ज्ञान प्रदान करणारी देवी मानले आहे. म्हणून तीचे आभार प्रकट करण्यात आले आहे. मानवी जीवनात समृध्दी आणनारी धन-धान्य प्रदान करणारी म्हणून तीची प्रार्थना करण्यात आली आहे.[10]

आकाशातुन उतरुन पर्वतरांगातूनयेवून यज्ञस्थळापर्यंत येण्यासाठी सरस्वतीला आवाहन करण्यात आले होते. सरस्वती देवी पितरांच्या रथावर आरुढ होऊन यज्ञस्थळी येते आणी कुशासन नष्ट करते आणी सुशासन प्रस्थापीत करते अशी लोकांची धारणा होती[11] सरस्वतीला एक नदीदेवता रुपात आवाहन केले आहे. तीच्या जलाने मानव पवित्र होतो. व्यक्तीच्या मनातील कलुषीत भावना तीच्या जलाने नष्ट होतात. शक्ती प्रदान करण्यासाठी, ऐश्वर्य प्रदान करण्यासाठी तीचे आवाहन केले गेले आहे.[12] संतान प्राप्तीसाठी, प्रजननात सहाय्य करण्यासाठी, गर्भधारणेत सहाव्य करण्यासाठी म्हणूनही सरस्वती ची प्रार्थना करण्यात आली आहे.[13]

सरस्वती नदीचे जल दिव्य, अदभूत शक्तींनी युक्त असे आहे. म्हणून तीला नमन करण्यात आले आहे समृध्दी, पोषण आणि धन प्रदान करणारी म्हणून तीची प्राथना केलेली आहे ऋग्वेदाच्या विविध सुक्त आणि ऋचामध्ये तीला 'सभुगा' म्हणजे सौभाग्य प्रदान करणारी, प्रतिष्ठा प्राप्तकरुन देणारी देवी मानले आहे. मुर्ख आणि कुप्रसिध्द लोकांना ज्ञान व प्रसिध्दी देणारी देवी म्हणूनही मानले आहे[14] सरस्वती आपल्यावर आस्था ठेवणा-या, भक्ती करणा-या व्यक्तीला समृध्दी प्रदान करते. इतर देवी-देवतांची निंदा करणाऱ्यांचा संहार करते व शत्रूंचा विनाश करते असे मानले आहे. म्हणून ऋग्वेदाच्या मंत्रात शत्रूंचा विनाश करण्यासाठी व शत्रूपासून सुरक्षा प्रदान करण्यासाठी म्हणून तिचे आवाहन करण्यात आले आहे.[15] ऋग्वेदकाळात यज्ञकर्ता हा सौभाग्य प्रदान करणा-या सरस्वतीची प्रार्थना करीत होता. त्यावरुन त्याची मातृसत्ताकता स्पष्ट दिसते. सरस्वतीसाठी 'प्रिया' ही उपाधीही वापरली आहे. संतान प्राप्तीसाठी सरस्वती नदीत शिजविलेले तांदूळ अर्पन करावे. सरस्वतीला संतान प्रदान करणाऱ्या इतर देवी-देवतांसोबत आवाहन केले आहे. ऋग्वेदात तीला विष्णू सोबत आवाहन केलेले आहे.[16]

2) यजुर्वेद :-

सरस्वती नदीला उपरोक्तपणे ऋग्वेदाच्या विविध मंत्रात आवाहन, प्रार्थना केली आहे. त्याचबरोबर यजुर्वेद ग्रंथातील मंत्रामध्येही सरस्वतीचा उल्लेख आला आहे. यजुर्वेदात उल्लेख आहे की, सरस्वती नदीत पाच विशाल नद्यांचे जल सम्मीलीत आहे. ती सरस्वती नदी पुढे देशावर आल्यांनतर पाच धारांमध्ये विभाजीत होते[17] ह्या वर्णनावरुन स्पष्ट होते की यजुर्वेदकाळात सरस्वती नदीच्या पाच सहाय्यक नद्या होत्या. त्यात दृषद्वती (घग्गर) शतुद्री (सतलज) विपाशा (बियास), रावी (पुरुष्णी) आणी चिनाब (अस्कीनी) ह्या होत्या ऋग्वेदकाळात सिन्धू आणि झेलम सुध्दा सरस्वती नदीच्या सहाय्यक नद्या होत्या. पण पुढील काळात म्हणजे यजुर्वेद काळात सिन्धू आणि वितस्ता (झेलम) ह्या दोन नद्या सरस्वती नदीपासून वेगळ्या झाल्या असाव्या.[18]

यजुर्वेद ग्रंथातही सरस्वतीच्या विवीध गुणांची प्रशंसा केली आहे. तीला उत्तम वाणी आणि ज्ञानाची देवी मानले आहे. सरस्वतीला पवित्रकारिणी, पोषणप्रदात्री आणि ऐश्वर्य प्रदान करणारी मानले आहे.[19] सत्यवाणीद्वारे सत्यमार्गाची प्रेरणा देणारी आणि सुमती ला जागृत करण्यासाठी तीचे आवाहन करण्यात आले आहे.[20] यजुर्वेदाच्या बहुतांश मंत्रात सरस्वतीचा उल्लेख आश्विनी कुमारांसोबत करण्यात आला आहे. ज्यात तीचे औषधी गुण सांगण्यात आले आहेत. तसेच

VOL- VII ISSUE- III MARCH 2020 PEER REVIEW e-JOURNAL IMPACT FACTOR 6.293 ISSN 2349-638x

बलवर्धक पदार्थ (दुधमध, सोमरस इत्यादी) उपलब्ध करुन देण्याबाबत सरस्वतीची प्रार्थना करण्यात आली आहे. [21]

3) सामवेद :-

सामवेद ग्रंथाच्या केवळ दोन मंत्रात सरस्वती नदीचा उल्लेख आला आहे. संतान प्राप्तीची कामना करण्यासाठी सरस्वतीला आवाहन करण्यात आले आहे. जनमानसाच्या आवश्यकता आणि कामना पूर्ती करणारी म्हणून तीचा उल्लेख करण्यात आला आहे. [22]

4) अथर्ववेद :-

अथर्ववेद ग्रंथात सरस्वती नदीला संतान प्रदान करणारी आणि विविध रोगातून मुक्ती प्रदान करणारी देवी म्हणून वर्णनित करण्यात आले आहे. आर्यांनी प्रजाजन प्रदान करण्यासाठी म्हणून तीची प्रार्थना केलेली आहे. [23] सरस्वतीला पित्रांना संतुष्टकरण्यासाठी आणि जिवंत असणाऱ्यांना उत्तम स्वास्थ व बलवर्धक अन्न पदार्थ प्रदान करण्यासाठी आवाहन करण्यात आले आहे. प्राचीन काळापासुन भारतीय संस्कृतीत तिर्थस्थानांच्या ठिकाणी आणि नदीच्या किनाऱ्यावर पितृ तर्पन करण्याची परंपरा आहे. लोक नदीच्या पवित्र जलाने पित्रांचे तर्पन करत आले आहेत. कारण त्यामुळे पितरांना देवलोकात स्थान प्राप्त होते अशी धारणा होती. व आजही तशीच धारणा आहे. यावरुन असे स्पष्ट होते की, वैदिक काळात सरस्वती नदी ही पितृ तृप्ती ची आश्रयस्थली होती. [24]

अथर्ववेदात सरस्वती नदीच्या किना-यावर किंवा सरस्वती नदीच्या खो-यात जवसाचे उत्पन्न होत असल्याचे उल्लेख आहेत. अथर्ववेदातील कृषी सुक्तातून स्पष्ट होते की, ऋग्वेद काळापासुन सरस्वती नदीच्या खो-यात कृषीचा विकास झाला. पुढे अथर्ववेद काळापर्यंत कृषी ही तत्कालीन लोकांचे उपजविकेचे प्रमुख साधन बनले होते. [25] अथर्ववेदाच्या एका मंत्रात शेतीसाठी नांगर वापरल्याचा उल्लेख आहे. तसेच सुर्य आणि वायुदेव यांच्याकडे सिंचनाद्वारे औषधी वनस्पती आणि उपयुक्त फळे निर्माण करण्याबाबत प्रार्थना केल्याचा उल्लेख आहे. [26] यावरुन स्पष्ट होते की, वैदिक काळातील ऋषींना हिमालयातून येणाऱ्या नद्यांच्या जलाचे महत्व माहिती होते.त्या जलापासुनचे कृषीविषयक आणि मानवीजीवनासाठीचे फायदे माहीती होते. त्यांनी सरस्वती नदीला एक विशाल नदी मानले होते. उपयुक्त नदी मानले होते. त्याचबरोबर तीला मातृदेवी मानले होते. अन्न-धन-संतती- ऐश्वर्य-औषधी इत्यादी प्रदान करणारी दात्री मानले होते.

5) ब्राह्मण ग्रंथे :-

उत्तरवेदकाळात अस्तीत्वात आलेल्या ब्राह्मण ग्रंथातही सरस्वती नदीच्या विविध रुपांचे वर्णन करण्यात आले आहे. तांण्ड्य ब्राह्मण ग्रंथात उल्लेख आहे की 'अनेक देवतांनी आकाशात अस्थिर असलेल्या सुर्याला आधार देण्यासाठी सरस्वतीला उभे केले. पण सरस्वती सुर्याचे ओझे सहन करु शकली नाही. सुर्याच्या ओझ्याने दबल्याने तीने वेडेवाकडे (नागमोडी) रुप धारण केले' [27] ह्या वर्णनावरुन स्पष्ट होते की ब्राह्मणकाळात सरस्वती नदी नागमोडी आकाराने पश्चीम दिशेकडे वाहत होती. तांण्ड्य ब्राह्मण ग्रंथात म्हटले की, सरस्वती नदीचे उगमस्थान ते राजस्थानातील विलुप्त स्थानापर्यंतचा जो प्रवाहक्षेत्र होता तो अनुष्ठान देश होय

याच प्रवाह क्षेत्राच्या भागात सरस्वतीला दृषद्वती नदी येवून मिळते ती संगमस्थली तर आर्यांची धार्मीक अनुष्ठानासाठीची अत्यंतपवित्र स्थली मानली जात होती.

ऐतरेय ब्राह्मण ग्रंथात सरस्वतीला वाणीची देवी मानले आहे. [28] तर शतपथ ब्राह्मण ग्रंथात तीला वाङमयदेवी च्या रुपात स्विकारले आहे. [29]

याशिवाय श्रौतकोश मध्येही सरस्वतीच्या विभिन्न रुपांचे वर्णन करण्यात आले आहे त्यात म्हटले की, 'पोर्णिमेच्या दिवशी केल्या जाणा-या विशेष अनुष्ठानप्रसंगी यज्ञकर्ता हा एका मंत्राद्वारे सरस्वतीला बली प्रदान करण्याबाबत म्हणतो'. म्हणजे ह्या मंत्रात अन्नधान्य व योग्य वाणीच्या प्राप्तीसाठी सरस्वतीला बली प्रदान करण्याबाबतचे वर्णन आहे. [30] तसेच शक्ती प्राप्त करण्याची महत्वाकांक्षा बाळगणाऱ्या व्यक्तीने एक मादी मेंढी सरस्वतीला अर्पन करण्याबाबत म्हटले आहे पण त्या मादी मेंढींचे तोंडातील सर्वच दात सुरक्षीत असले पाहिजे. [31] संस्कृत शब्दकोषात सरस्वतीसाठी ब्राम्ही,भारती,भाषा, गिर, वाणी इत्यादी पर्यायवाची शब्द वापरलेले आहेत यावरुन स्पष्ट होते की, सरस्वती ही वाणी व संभाषणाची देवी होती.

ADARSH VYAPARI EDUCATION SOCIETY ... COLLEGE ... Dist. ...



महाकाव्यकाळात रामायण आणि महाभारतातही कांही ठिकाणी सरस्वती नदीचा उल्लेख येतो. रामायणात दोन ठिकाणी सरस्वती नदीला उल्लेख येतो. एक म्हणजे अयोध्येचा राजा दशरथ यांचा अकस्मात मृत्यू होतो तेंव्हा त्यांचा पुत्र राजकुमार भरत हा गिरीवृज प्रदेशात असतो ह्या मृत्यूचा संदेश घेवून एक दूत भरताकडे जाण्यासाठी निघतो तेंव्हा तो दूत वाटेतील पुष्करावती, प्राची सरस्वती चे दर्शन करतो असा उल्लेख आहे. दुसरे म्हणजे दुताचा तो संदेश वाचून भरत आयोध्येकडे येण्यासाठी निघतो व तोही शतुद्री (सतलज) नदी पार करुन महाशैल पर्वत पार करुन, सरस्वती नदी पार करतो असा उल्लेख आहे.[12] तसेच महाभारतातील 'वनपर्व' व 'शल्यपर्व' मध्येही सरस्वतीचे विस्तृत वर्णन करण्यात आले आहे. त्यामध्ये सरस्वतीला वेदाची जननी असे संबोधले आहे.[13] पुढे मनुस्मृती ग्रंथात म्हटले की सरस्वती व दृषद्वती घग्गर नदीचा दुआब म्हणजे ब्रह्मावर्त प्रदेश होय. त्याच ब्रह्मावर्तला महाभारतात कुरुक्षेत्र असे संबोधले गेले आहे

रामायण व महाभारतात सरस्वती नदीचे उल्लेख फार कमी प्रमाणात सापडतात यावरुन स्पष्ट होते की, सरस्वती नदीचा जलप्रवाह हळूहळू कमी-कमी होत गेला. तीचा प्रवाहमार्ग क्षीण होत गेला. त्या प्रवाह मार्गात छोटे-छोटे जलसाठे तयार होत गेले. त्या लुप्त होत गेलेल्या नदी पात्रात किंवा किना-यावर अनेक विहीरी बनवल्या गेल्या. ज्या विहीरींना भरपूर पाणी होते राजस्थानातील विनशन नामक तिर्थस्थळाच्या ठिकाणी सरस्वती पुर्णता लुप्त झाली[14] विनशन नंतर सरस्वती नदीचा जलप्रवाह पुर्णत वाळून गेला होता. महाभारतात सरस्वती च्या अदृश्य होण्याचे अनेक वर्णन आहेत. एक म्हणजे, विनशन मधील शुद्र आणि अभिरां प्रती द्वेष प्रकट करण्यासाठी म्हणून सरस्वती लूप्त झाली दुसरे वर्णन म्हणजे निषाद राज्याच्या जवळ येवून सरस्वती त्यांच्या स्पर्शांपासून वाचन्यासाठी म्हणून पृथ्वीमध्ये समाविष्ट झाली.[15]

अशाप्रकारे सरस्वती नदीचा उल्लेख ऋग्वेदापासुन प्राप्त होतो. त्या पुर्ववैदिक काळात आणि उत्तर वैदिक काळात सरस्वती नदीला ज्ञानदेवता म्हणून पूजले जात होते कारण तिच्याच किना-यावर वेदांतील अनेक ऋचांची रचना करण्यात आली होती. म्हणून तीचे फार मोठे ऐतिहासीक महत्व होते तत्कालीन सामाजिक, धार्मिक, सांस्कृतीक जीवनावर सारस्वतीचा प्रभाव होता. तत्कालीन मानवी जीवनाच्या जडणघडणीत तीचे फार मोठे योगदान होते पण पूढे महाभारत काळात अनेक भुवैज्ञानिक बदल झाले तीच्या जलद प्रवाहाने आणी येणा-या महापुराने तीच्या किना-यावर असलेले मोठे मोठे पर्वत ढासळले असावे. आणि ही नदी लुप्त पावली असावी. राजस्थानातील अफाट रेताड जमीनीत विनशन येथे ती लुप्त झाली हे मात्र निश्चीतपणे सांगता येते. ही नदी आज आपण भारताच्या नकाशात दाखवू शकत नाही म्हणून तीचे अस्तीत्व आपण नाकारुही शकत नाही.कारण वैदिक साहीत्यात, रामायण, महाभारतात तीचे उल्लेख आलेले आहेत.

संदर्भ ग्रंथ सुची

1. ऋग्वेद, (संपादक) श्रीपाद शर्मा, औंधनगर 1940 मंडल-10, सुक्त-64, ऋचा9
2. उपरोक्त, 10/75/5
3. उपरोक्त, 10/131/5
4. उपरोक्त, 7/36/6
5. पूर्व उद्धृत पुस्तक पी.एल. भार्गव पृ.762
6. पुर्वोक्त 4, 6/61/2,8,13
7. उपरोक्त, 7/95/2
8. उपरोक्त, 6/61/1
9. उपरोक्त, 1/3/11
10. उपरोक्त, 6/61/10,12,14
11. उपरोक्त, 5/43/11, 10/17/8-9-10-11
12. उपरोक्त, 10/30/12
13. उपरोक्त, 10/182/2
14. उपरोक्त, 8/21/17, 7/95/4-6
15. उपरोक्त, 6/49/7, 7/95/4-5
16. ऋग्वेद, 8/54/4
17. यजुर्वेद (संपा), श्रीपाद शर्मा, औंधनगर 1938, 34/11
18. पुण्य सलीला सरस्वती नदी, चौहाण, देवेंद्र सिंह, जयपूर 2004,पृ.28-29
19. यजुर्वेद, 20/84
20. उपरोक्त, 20/85
21. उपरोक्त, 19/95, 20/35
22. सामवेद, ऋचा क्रं.1460

23. अथर्ववेद, (संपा), श्रीपाद शर्मा, औंध नगर 1918, 3/70/1
24. उपरोक्त, 18/1/42
25. उपरोक्त, 3/13/1-9
26. उपरोक्त, 3/13/5
27. ताण्ड्य ब्राह्मण 25/10/11
28. ऐतरेय ब्राह्मण, आनंदाश्रम संस्कृत सिरीज पुणे 1896, 3/37
29. शतपथ ब्राह्मण, 12/9 : 1/14
30. पूर्व उद्धृत पुस्तक जोशी पृ.167 व गीतकोश,60
31. उपरोक्त, पृ.173
32. रामायण, वाल्मीकी कृत, गीता प्रेस, गोरखपूर, अयोध्याकांड 68/15/17
33. पूर्व उद्धृत पुस्तक, वेदिकलिट व चौहाण पृ.38
34. महाभारत, (संपा), वी.एस. सुखटणकर, सभापर्व, अध्याय 83, श्लोक 111-112
35. महाभारत, शल्यपर्व, अध्याय-37, श्लोक 1 व वनपर्व,अध्याय-130, श्लोक-4

Aayushi International Interdisciplinary Research Journal
ISSN 2349-638X
www.aiirjournal.com

Dr. Anil Chidrawar
I/C Principal
A.V. Education Society's
Degloor College, Degloor Dist.Nanded